Rotary
Club of Latur Mid-town

UNITE FOR GOOD

साप्ताहिक

# रोटरी दिशा

## ROTARY CLUB OF LATUR MID-TOWN

ROTARY INTERNATIONAL DISTRICT 3132 | Club No.: 22604

ऑक्टोबर - २०२५ | नववा अंक

## कम्युनिटी डेव्हलपमेंट विशेषांक





**Rtn.Francesco Arezzo**
RI President 2025-26



**Rtn.Sudhir Lature**
Dist.Governor 2025-26



**Rtn.Amol Dadge**
President



**Rtn.Pawan Malpani**
Secretary

## Guest Editor Rtn.Vikas Barule




प्रिय रोटेरियन बांधवांनो,

रोटरी ही केवळ एक संस्था नाही, तर सेवा, मानवता आणि प्रगती यांचे प्रतीक आहे. समाजातील प्रत्येक घटकाच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्न करणे हीच रोटरीची खरी ओळख आहे. आज आपण 'कम्युनिटी डेव्हलपमेंट' म्हणजेच समाज विकास या विषयावर आधारित विशेषांक प्रकाशित करत आहोत, याचा मला अतिशय अभिमान आणि आनंद आहे.समाज म्हणजे केवळ व्यक्तींचा समूह नव्हे, तर परस्परावलंबनाने उभा असलेला सजीव ताना-बाना आहे. या तान्याला बळकटी देणे, सामाजिक समतोल राखणे आणि प्रत्येक घटकाला प्रगतीच्या प्रवाहात सामील करणे हेच खऱ्या अर्थाने कम्युनिटी डेव्हलपमेंटचे सार आहे. शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, महिला सक्षमीकरण, युवकांना मार्गदर्शन आणि आर्थिक स्वावलंबन या प्रत्येक क्षेत्रात रोटरीने आपल्या कार्यातून समाजावर सकारात्मक ठसा उमटवला आहे.रोटरीचे प्रकल्प हे केवळ मदतकार्य नसून शाश्वत बदल घडविण्याचे साधन आहेत. एका गावात पाणीपुरवठा योजना राबविणे, शाळांमध्ये डिजिटल शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे, आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करणे किंवा युवकांसाठी कौशल्यविकास प्रशिक्षण देणे हे सर्व समाजाच्या आत्मनिर्भरतेकडे टाकलेले पाऊल आहे. अशी प्रत्येक कृती ही 'सेवा सर्वोपरि' या आपल्या मूलमंत्राची साक्ष देते.आजच्या काळात 'कम्युनिटी डेव्हलपमेंट' या संकल्पनेचा अर्थ अधिक व्यापक झाला आहे. केवळ भौतिक सुविधा नव्हे, तर समाजातील विचार, संस्कार, परस्पर आदर व सहकार्याची भावना वाढवणे हेही तेवढेच महत्त्वाचे आहे. समाजाच्या विकासात सहभागी होताना आपण प्रत्येक व्यक्तीच्या सन्मानाची जाणीव ठेवतो कारण समाजाचा खरा विकास तेव्हाच शक्य होतो जेव्हा त्यातील प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या क्षमतेवर उभी राहते.या विशेषांकाद्वारे आपण रोटरीच्या स'ाजविकासातील योगदानाचा आढावा घेत आहोत. या अंकातून प्रत्येक सदस्याला नवीन प्रेरणा मिळेल आणि आपला सेवाभाव आणखी दृढ होईल, याची 'ला खात्री आहे.अतिथी संपादक म्हणून ही जबाबदारी 'ला सोपविल्याबद्दल मी रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन व संपादक मंडळाचे मनःपूर्वक आभार मानतो. चला, आपण सर्व मिळून रोटरीच्या कार्यातून समाजात उज्ज्वल, समतोल आणि प्रगत भविष्याची निर्मिती करूया.

रो.विकास बारूळे
अतिथी संपादक, रोटरी दिशा

## Secretary Report

- मिटींग ची सुरुवात राष्ट्रगीताने झाली
- फोरवे टेस्ट चे सामुहीक वाचन झाले.
- मागील मिटींग चा अहवाल सेक्रेटरी पवन मालपाणी यांनी वाचून दाखवला
- दृष्टी झोनल सेमीनार पब्लिक इमेज व युथ सर्विस या बद्दल ची माहिती रो. सचिन मालु यांनी दिली
- पुरग्रस्तांना किटचे वाटप करणार असल्याचे अध्यक्षांनी सांगितले .
- क्लब बुलेटिन : साप्ताहिक बुलेटिन चे विमोचन माजी अध्यक्ष रो. रविंद्र बनकर, माजी अध्यक्ष रो. विजय शाह व गेस्ट डॉ. अर्जुन मंदाडे यांच्या हस्ते झाले
- नेशन बिल्डर अवार्ड- ची माहिती अध्यक्षांनी दिली
- गरजु लोकांसाठी जुने कपडे संकलन : प्रोजेक्ट चेअरमन प्रशांत भाटगावे यांनी जुने चांगले कपडे संकलित करून गरिबांना वाटप करणार असल्याचे सांगितले व संकलन केंद्राची माहिती दिली.
- माजी अध्यक्ष रो. विजय शाह यांनी मिटींग मधील उपस्थिती बाबत चिंता व्यक्त केली.
- रो. सचिन मालु यांनी अन्नपूर्णा प्रकल्पाच्या अर्थिक उभारणी साठी नाटक घेणार असल्याचे सांगितल
- गेस्ट डॉ. अर्जुन मंदाडे यांचे पेन देऊन स्वागत करण्यात आले.
- फेलोशिप अनाउन्समेंट श्रध्दानंद अपशेट्टी यांनी केली यांनी केली




Man of The Meeting



Rtn.Ravindra Bankar

1st Come in the Hall



Rtn.Vishnudas Toshniwal

## रोटरी कम्युनिटी डेव्हलपमेंट - परिवर्तनाची प्रेरणा

रोटरी ही संस्था जगभरात सेवा सर्वोपरि या तत्त्वावर कार्य करते. तिचा उद्देश केवळ सामाजिक सेवा नसून, समाजात शाश्वत विकास आणि परिवर्तन घडविणे हा आहे. त्या दृष्टीने म्हणजेच समाज विकास हा रोटरीच्या कार्याचा अत्यंत महत्त्वाचा पाया आहे. कम्युनिटी डेव्हलपमेंट म्हणजे काय?''कम्युनिटी डेव्हलपमेंट'' म्हणजे समाजातील प्रत्येक घटकाच्या प्रगतीसाठी लोकांना सक्षम बनविण्याची प्रक्रिया. हे फक्त आर्थिक विकासापुरते मर्यादित नसून, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, रोजगार, पर्यावरण, सामाजिक मूल्ये आणि सक्षमीकरण या सर्व क्षेत्रांचा समावेश करते.यात उद्दिष्ट असते समाजातील प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या पायावर उभी राहावी आणि आपल्या स्ुदायाच्या प्रगतीत सक्रिय सहभाग घ्यावा. रोटरीचे योगदानरोटरीचे जगभरातील लाखो सदस्य स्थानिक पातळीवर समाजाच्या विविध गरजांनुसार प्रकल्प राबवतात. क्षेत्रात रोटरीने अनेक उपक्रमांद्वारे समाजाचा चेहरा बदलला आहे.

काही उल्लेखनीय उपक्रमः

शिक्षण व साक्षरता प्रकल्पः ग्रामीण भागात शाळांची उभारणी, ग्रंथालये, ई-लर्निंग सुविधा.

आरोग्य प्रकल्पः मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, रक्तदान, पोलिओ निर्मूलन मोहिमा.

पाणी व स्वच्छता उपक्रमः शुद्ध पाणी योजना, शौचालय निर्मिती, प्लास्टिकमुक्त गाव संकल्पना.

उत्पन्नवाढ प्रकल्पः महिला बचत गट, स्वयंरोजगार प्रशिक्षण, उद्योजकता प्रोत्साहन.

पर्यावरण संवर्धनः वृक्षारोपण, जलसंवर्धन, नवीकरणीय ऊर्जेचा प्रसार.

रोटरीचे हे प्रकल्प फक्त मदतीसाठी नसतात; ते लोकांना स्वावलंबन आणि आत्मविश्वास देण्यासाठी असतात. त्यामुळे रोटरीची सेवा ''दान'' नसून ''सक्षमीकरणाची प्रक्रिया'' ठरते. ग्रामीण विकास रोटरीचे मुख्य लक्ष भारतातील मोठा समाज घटक ग्रामीण भागात राहतो. म्हणून रोटरी क्लब्सनी गावपातळीवरील विकासावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन, पाण्याचे पुनर्भरण प्रकल्प, ग्रामस्वच्छता अभियान, आणि युवकांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा या उपक्रमांमुळे ग्रामीण भागात परिवर्तन घडले आहे.अनेक ठिकाणी रोटरीने ''आदर्श ग्राम'' प्रकल्प राबवून संपूर्ण गावाची जीवनशैली बदलवली आहे. सामाजिक एकात्मतेचा धागा कम्युनिटी डेव्हलपमेंटचा खरा अर्थ फक्त भौतिक विकास नाही, तर मानवी नात्यांचा विकास आहे. रोटरी समाजात आपुलकी, सहकार्य आणि संवेदना यांचा सेतू निर्माण करते. जेव्हा समाजातील प्रत्येकजण ''मी नाही, आपण'' या विचाराने काम करतो, तेव्हा खरी प्रगती घडते. शाश्वत भविष्याची वाटचालआजच्या काळात विकासाची व्याख्या ''शाश्वततेशिवाय'' अपूर्ण आहे. म्हणून रोटरी आपले सर्व उपक्रम पर्यावरणपूरक आणि दीर्घकालीन परिणामकारक ठेवण्यावर भर देते. जलसंवर्धन, नवीकरणीय उर्जा, कचरा व्यवस्थापन, आणि हरित उपक्रम ही रोटरीच्या भविष्यदृष्टीची उदाहरणे आहेत. निष्कर्ष म्हणजे केवळ सुविधा निर्माण करणे नाही, तर जीवनाला दिशा देणे आहे. रोटरीची सेवा लोकांना त्यांच्या क्षमतेवर विश्वास ठेवायला शिकवते. ती समाजाला ''स्वतःच्या विकासाची ताकद'' ओळखायला मदत करते.रोटरीचे प्रत्येक प्रकल्प, प्रत्येक उपक्रम आणि प्रत्येक सदस्य याच उद्दिष्टाने प्रेरित आहेत ''एक समाज, एक ध्येय सर्वांच्या प्रगतीकडे वाटचाल.''रोटरी म्हणजे फक्त सेवा नव्हे, तर परिवर्तनाची प्रेरणा आहे

## Register For




## Rorary CSR Awards






## Rotary Mid Town this Week  Photo Gallery






## अभिनंदन






रो.संतोष पांचाळ यांची लातूर शहर
भाजपा चिटणीसपदी निवड

शासकीय मान्यताप्राप्त
PESTEDGE®
EnviroCare's
Pest Control Services

होय ! आम्ही देतो या रोगराई पसरवणाऱ्या व
नुकसान करणाऱ्या घातक किटकांपासून मुक्तता

Pest Control Services



वाळवी, झुरळ, मच्छर, उंदीर, घुस, साप, ढेकूण, माश्या, कोळी, मुंगी,
पाल इ. उपद्रवी किटकांचे प्रभावी नियंत्रण करण्यासाठी संपर्क करा.

75177 55567
www.pestedge.in

Protecting Health, Securing Property, Preserving Environment

बांधकाम करताना वाळवी प्रतिबंधक उपाय केल्यास वाळवी पासुन किमान ४०-५० वर्षांपर्यंत आपल्या घराचे संरक्षण, नविन तंत्रज्ञानामुळे शक्य आहे.